दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | बुधवार दि.६ मे २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २४५ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Wednesday 6 May 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 245 | Pages 4 | Rate 4 Rs


## एकनाथ शिंदेंकडून मंत्रिमंडळात बदलांचे संकेत

**मुंबई**–राज्यातील सर्व निवडणुका पार पडल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठ्या हालचालींना सुरुवात झाल्याचे संकेत मिळत आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी निर्णायक पावले उचलण्याची तयारी सुरू केली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, येत्या दिवाळीपूर्वी राज्य मंत्रिमंडळात मोठे फेरबदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या संभाव्य बदलांमुळे सध्या मंत्रिपदावर असलेल्या अनेक नेत्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे.गेल्या अडीच वर्षांच्या काळात काही मंत्र्यांची कामगिरी अपेक्षेप्रमाणे नसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांकडून सर्व मंत्र्यांच्या कामाचा सविस्तर आढावा घेतला जात आहे. या अहवालाच्या आधारेच पुढील निर्णय घेतले जाणार असल्याचे समजते. ज्या मंत्र्यांनी आपल्या खात्यात प्रभावी कामगिरी दाखवली नाही किंवा पक्षाच्या विस्तारासाठी विशेष प्रयत्न केले नाहीत, अशा मंत्र्यांना पदावरून दूर करण्याची शक्यता आहे.

# लैंगिक शोषणातील आरोपींना पॅरोल देऊ नका-मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्र्यांचे निर्देश



**पुण्याच्या नसरापूर बलात्कार व हत्या प्रकरणामुळे अवघ्या राज्यात संतापाची लाट उसळली असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधी व न्याय विभागाला लैंगिक शोषणातील आरोपींना पॅरोल न देण्याचे स्पष्ट निर्देश दिलेत. लैंगिक प्रकरणातील आरोपी हे ८० ते ९० टक्के त्याच गुन्ह्यात अटक होऊन पॅरोलवर सुटलेले असतात. त्यानंतर पुन्हा ते तोच गुन्हा करतात. त्यामुळे या आरोपींना पॅरोल देऊ नका, असे ते म्हणालेत.पुण्याच्या भोर तालुक्यातील नसरापूर येथील एका ४ वर्षीय चिमुकलीवर एका ६५ वर्षीय नराधमाने बलात्कार करून तिची दगडाने ठेचून हत्या केल्याची संतापजनक घटना घडली आहे. या घटनेमुळे महाराष्ट्रात खळबळ माजली आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत विधी व न्याय विभागाला उपरोक्त निर्देश दिलेत.**

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**

ते म्हणाले, लैंगिक प्रकरणातील आरोपी हे ८० ते ९० टक्के त्याच गुन्ह्यांत अटक होऊन पॅरोलवर सुटलेले असतात. पॅरोलवर सुटल्यानंतर ते पुन्हा तेच गुन्हे करतात. २०१४ ते २०१९ या काळात सरकारने यासंबंधी एक कायदा केला होता. सदर कायदा २-३ वर्षे अस्तित्वात होता. पण कालांतराने तो कायदा कोर्टाने रद्दबातल केला. आता पुन्हा तसाच कायदा करा, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस नसरापूर प्रकरणावर बोलताना म्हणाले होते, मी स्वतः पीडितेच्या वडिलांशी दोनवेळा बोललो. मी त्यांना समजावून सांगितले की, आपल्याला नराधमाला मृत्यूदंडाची शिक्षा करून घ्यायची आहे. त्यासाठी वेळेत चार्जशीट दाखल होणे व केस चालणे महत्त्वाचे आहे. या प्रकरणी हायकोर्टाच्या माध्यमातून सगळ्या गोष्टीला फास्ट ट्रॅकवर नेण्याचा प्रयत्न केला जात आहे. लोकशाहीत आपल्या सगळ्यांना अशा नराधमाला भरचौकात फाशी द्यावी असे वाटते. पण लोकशाहीत ते करता येत नाही. लोकशाही कायद्याने चालते. पण कुणालाही कायद्याचा दुरुपयोग करता येऊ नये, यासाठी कोणतीही पळवाट न ठेवता त्याला मृत्यूदंडाची शिक्षा कशी होईल याचा राज्य सरकार करेल.

## जात पंचायतीसाठी बोलवून महिलेस मारहाण,चौघांविरुद्ध गून्हा नोंद

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**




शनिवार दिनांक २ मे रोजी केजला जात पंचायत आहे म्हणुन बोलावून घेवून विनाकारण शिवीगाळ करून,लाकडी काठीने मारहाण करून जखमी केले व जीवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी चौघाविरुद्ध केज पोलिसात गून्हा नोंद झाला आहे.पारा येथील ललिता भागवत शिंदे या महिलेचे तीचा पती भागवत शिंदे सोबत पटत नाही.म्हणुन ही महिला सद्या बोबडेवाडी येथेच माहेरी राहते.दोघांच्या मधील मतभेद कमी करण्यासाठी जात पंचायतीचे आयोजन केले असल्याचा निरोप देऊन ललिता शिंदेला केजला बोलावून घेतल्या वरून ही महिला केजला आली असता शनिवारी सायंकाळी साडे चार वाजण्याच्या दरम्यान केज येथील बसस्थानक परिसरात आरोपीतानी संगनमत करून विनाकारण शिवीगाळ करून लाकडी काठीने मारहाण करून जखमी केले.व साक्षीदार भांडण सोडविण्यासाठी आले आसता त्यांना ही मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी ललिता भागवत शिंदे रा.पारा ह. मु.बोबडेवाडी या महिलेच्या फिर्यादीवरून पती,भागवत शामा शिंदे, नवनाथ बाबू शिंदे,राजेंद्र सुबराव शिंदे,व कृष्णा नवनाथ शिंदे या चौघां विरुद्ध केज पोलिसात गून्हा नोंद झाला आसून पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शना खाली पोलीस उप निरीक्षक बालासाहेब रोडे हे पुढील तपास करीत आहेत.

## अनिल वैरागे यांचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर संविधान अमृत महोत्सव गौरव पुरस्काराने केला सन्मान

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**



केज येथील भूमिपुत्र अनिल लिंबाजी वैरागे यांना संगीत क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान अमृत महोत्सव गौरव पुरस्कार २०२६' देऊन गौरविण्यात आले आहे. आशादीप महिला आधार मंच या सामाजिक संस्थेच्या व 'लेक लाडकी' अभियानाच्या संयुक्त विद्यमाने भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त तसेच महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त हा पुरस्कार प्रदान केला आहे.

अनिल वैरागे यांनी संगीत क्षेत्रात केलेले निस्वार्थ कार्य, त्यांची सातत्यपूर्ण सेवा व कला जपण्याचा ध्यास यांचा गौरव म्हणून त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती. हा पुरस्कार सोहळा दिनांक ३ मे २०२६ रोजी मुंबई येथील महर्षी दयानंद महाविद्यालय एमडी कॉलेज परळ (पूर्व) येथे आयोजित करण्यात आला .

या सोहळ्यास महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक व कवी नंदेश उमाप डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पंतु अक्षय आंबेडकर सिने अभिनेत्री डॉक्टर कॅरेन टेरी रजा तसेच महाराष्ट्र राज्याच्या महिला आयोगाच्या मा. अध्यक्ष निर्मला सामंत प्रभावळकर आशादीप महिला आधार मंचाच्या अध्यक्षा आशाताई भोईर यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला त्याच बरोबर या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर आणि सेलिब्रिटी देखील उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून व संविधानाचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. हा पुरस्कार योग्य व्यक्तीला मिळाल्याने केज शहरासह रसिक श्रोते, मित्रपरिवार आणि विविध स्तरातून बीड जिल्ह्यातील अनिल वैरागे, गौतम खंडागळे ,आम्रपाली साबळे ,डॉ. रत्ना पनवेकर, सुनीता बोधने ,व संतोष ससाने, यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## आजच्या विद्यार्थ्यांना संस्कार देण्यास पालक कमी पडत आहे प्रा.डॉ.कविता गित्ते-कराड



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

नुकत्याच जाहीर झालेल्या शालांत प्रमाणपत्र परिक्षा इयत्ता बारावी बोर्ड परिक्षेचा निकाल जाहीर झाला यात साने गुरुजी निवासी उच्च माध्यमिक विद्यालय केजचा विज्ञान शाखेचा निकाल ९४.८९ टक्के तर कला शाखेचा निकाल ७५% असा लागला.यात विशेष प्राविण्य प्राप्त विद्यार्थी विज्ञान शाखेतील

कु.चोले पंकजा महादेव ८१.८३% प्रथम,कु. चव्हाण अंजली आश्रुबा ८०.५०% द्वितीय,कु. आघाव ऋतुजा तात्याराव ८०.१७ % तृतीय,कला शाखेतील

चि.खाडे आकाश दत्तात्रय ७२.३३% प्रथम

कु.मस्के पुजा प्रताप ६९.३३% द्वितीय,कु.चौरे मुक्ता नारायण ६९% तृतीय तसेच इतर

गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष अँड.उद्धवराव कराड उपाध्यक्ष राजेश कापसे सर व संकुलाच्या प्राचार्या डॉ.कविता कराड-गित्ते मॅडम यांच्या प्रमुख उपस्थितीत सत्कार करण्यात आला आहे.या प्रसंगी मार्गदर्शन करताना संस्थेचे अध्यक्ष अँड.उद्धवराव कराड यांनी सांगितले की, आमच्या शाळेत येणारा प्रत्येक विद्यार्थी हा ग्रामीण भागातील व ऊसतोड कामगार यांच्या घरातुन आलेला असतो याची आम्हाला जाणीव असते तसेच ते निवासी राहत असल्याने आमचे शिक्षक त्यांना चांगल्या पद्धतीने शिक्षण देण्याचे काम करत असते. अतिरिक्त तासिका घेण्याचे काम करतात यामुळे येथील विद्यार्थ्यांना चांगल्या पद्धतीने अभ्यास होतो असे सांगितले. संकुलाच्या प्राचार्या डॉ. कविता कराड-गित्ते मॅडम यांनी ही विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, आजच्या विद्यार्थ्यांना संस्कार देण्यास पालक कमी पडतात फॅशनच्या आपले मुले मुली संस्कार शुन्य आहे वागत असुन फॅशनच्या दुनियेत आपली संस्कृती विसरत चालले आहेत या मुळे भरकटलेल्या पिढीला घरात संस्कार देणे आवश्यक आहे.परिक्षा देणा-या मुले मुलींना अभ्यासाबरोबर बाहेरच्या वातावरणाची देणे आवश्यक आहे जर ही माहिती नाही दिली तर तरुणाई व्यसनाधीन होत आहे.मुला मुलींचे पळून जाण्याचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे.या परिक्षा काळात आपल्या भागातील परिक्षेला जात आहे असे सांगून मुली पडून गेल्याचे प्रकार घडले आहेत असे प्रकार जर घडत असतील तर तुम्ही पालक म्हणून व आम्ही शिक्षक म्हणून कुठे तरी कमी पडत आहोत याचे आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे असे सांगितले या प्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांचे माता पालकांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती.

## आदिवासी सातपुडा भिल्ल समाज महापंचायतीच्या पूर्वतयारीसाठी १० मे रोजी मोलगी येथे बैठक

### आदिवासी बांधवांच्या गौरवशाली परंपरेचे रक्षण करण्यासाठी महापंचायतीचे आयोजन



दैनिक वादळ वार्ता
**रवींद्र वळवी । मोलगी**

उत्तर महाराष्ट्रातील सातपुडा डोंगररांगांमध्ये वसलेल्या आदिवासी बांधवांनी आपल्या गौरवशाली परंपरेचे रक्षण करण्यासाठी आणि समाजातील अनिष्ट प्रथांना मूठमाती देण्यासाठी 'आदिवासी सातपुडा भिल्ल समाज महापंचायती'चा बिगुल फुंकला आहे. या आदिवासी सातपुडा भिल्ल समाज महापंचायतीच्या पूर्वतयारीसाठी १० मे २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता मोलगी येथील शासकीय विश्रामगृहाच्या आवारात एका भव्य नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

अक्कलकुवा तालुक्यातील ज्येष्ठ पदाधिकारी आणि समाजसेवकांनी अलीकडेच एकत्र येऊन या महापंचायतीची रुपरेषा आखली. या प्राथमिक बैठकीत नंदुरबार जिल्हा परिषदेचे माजी समाज कल्याण सभापती रतन पाडवी, जि.प. माजी उपाध्यक्ष सुहास नाईक, माजी जिल्हा परिषद सदस्य सी. के. पाडवी, शिवराम वळवी यांसारख्या दिग्गज नेत्यांसह तालुक्यातील पोलीस पाटलांनी सहभाग नोंदवला. सातपुडा पट्ट्यातील ही भिल्ल समाज महापंचायत ऐतिहासिक ठरवण्यासाठी मोलगी भागात सध्या जोरदार हालचाली सुरु आहेत.

वाढत्या शहरीकरणामुळे आणि डिजिटल युगाच्या प्रभावामुळे आदिवासी संस्कृतीतील काही मूळ गाभा हरवत चालल्याची भीती व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर पारंपारिक चालीरीतींचे जतन :- बदलत्या काळात आपली मूळ संस्कृती आणि परंपरा पुढच्या पिढीपर्यंत कशा पोहोचवता येतील, यावर महापंचायतीत मंथन होणार आहे.

लग्नसराई आणि अनिष्ट प्रथाः सध्या सुरु असलेल्या लग्नसराईमध्ये आदिवासी परंपरेशी विसंगत अशा अनेक नवीन आणि खर्चिक प्रथा शिरल्या आहेत. या अनिष्ट प्रथांना आळा घालून विवाह पद्धतीमध्ये एकसमानता आणण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय या महापंचायतीचे मुख्य अधिवेशन नेमके कुठे आणि कधी घ्यायचे, याचा अंतिम निर्णय १० मे रोजी होणाऱ्या बैठकीत घेतला जाईल. विशेष म्हणजे, कोणताही निर्णय लादण्याऐवजी प्रथम तालुक्यातील प्रत्येक गावातील समाजबांधवांची मते जाणून घेतली जाणार आहेत. 'लोकशाही' मार्गाने समाजाचा विकास साधणे, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. या बैठकीसाठी करमसिंग पाडवी, सीताराम राऊत, वाण्या वळवी, केवजी पाडवी, सोन्या वसावे, प्रमोद वसावे आणि गमेरसिंग राऊत यांच्यासह अनेक मान्यवरांनी कंबर कसली आहे. अक्कलकुवा तालुक्यातील जास्तीत जास्त समाजबांधवांनी १० मे रोजी सकाळी १०:३० वाजता मोलगी येथे उपस्थित राहून आपले परखड मत मांडावे, असे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात आले आहे. आपली संस्कृती हीच आपली ओळख आहे. ती टिकवण्यासाठी आणि समाजातील अनिष्ट प्रवृत्तींना रोखण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येणे काळाची गरज असल्याचे ही आवाहन संयोजकांनी केले आहे.

# संपादकीय

## उष्माघाताचे संकट!

महाराष्ट्रातच नव्हे तर देशातील काही भागांतील नागरिकांना एका भीषण नैसर्गिक संकटाचा सामना करावा लागत आहे. अनेक राज्यांमध्ये तापमानाचा उच्चांक पाहायला मिळत असून, नागरिक निसर्गाच्या अत्यंत दाहक आणि भीषण संकटाशी सामना करत आहेत. वैशाख वणव्याची दाहकता एप्रिलमध्येच जाणवू लागली असून, ४५ अंशांच्या पार गेलेल्या तापमानामुळे आभाळातून पावसाऐवजी आगीच्या ज्वाळाच खाली येत आहेत की काय, अशी भीषण स्थिती निर्माण झाली आहे.उत्तर प्रदेशातील बांदा येथे देशातील सर्वाधिक ४७.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असून, उन्हाच्या तडाख्याने सीमा ओलांडली आहे. राजस्थान, पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि मध्य प्रदेशासह पूर्व भारतातील पश्चिम बंगाल, बिहार आणि झारखंडमध्येही सूर्याचा प्रकोप जाणवत आहे. दक्षिण भारतात तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशात उष्णतेच्या लाटेने धोक्याची पातळी ओलांडली. ओडिशामध्येही उष्णतेने उच्चांक गाठला आहे. दुसऱ्या बाजूला जम्मू–काश्मीरसारख्या थंड प्रदेशातही तापमानाचा पारा चढलेला दिसत असून, ही स्थिती काळजाचा ठोका चुकवणारी आहे. राज्यात नेहमीप्रमाणे विदर्भातील अकोला, चंद्रपूर आणि नागपूर या जिल्ह्यांत उष्णतेने कहर आहे. विशेषतः अकोल्याचा पारा ४६.९ अंशांवर पोहोचल्याने हे शहर उष्ण शहरांच्या यादीत स्थान वरच्या स्थानी आहे. केवळ विदर्भच नव्हे, तर मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातही उष्णतेच्या लाटेने नागरिकांची लाहीलाही होत आहे. उष्णतेच्या लाटांचा भूगोल आता वेगाने बदलत असून, उत्तर भारताकडून ही आग मध्य आणि दक्षिण भारताकडे सरकली आहे. अगदी हिमालयाच्या कुशीतील जम्मू–काश्मीरही या आगीतून सुटलेले नाही. ही उष्णता आता केवळ घामाच्या धारा काढणारी उरली नसून ती थेट जीव घेण्यावर टपली आहे. परभणीपासून हिंगोलीपर्यंत आणि नगरपासून नागपूरपर्यंत सात–आठ जणांचा उष्माघातामुळे मृत्यू झाला आहे. शेतात राबणारा शेतकरी आणि कामासाठी पायपीट करणारा कष्टकरी आज या निसर्गनिर्मित संकटाचा बळी पडत आहे, हे विदारक सत्य आहे. पर्यावरण शास्त्रज्ञांच्या मते, ही दाहकता केवळ ऋतुचक्राचा भाग नसून 'हवामान बदलाचा' एक धोक्याचा इशारा आहे. वाढते सिमेंटचे जंगल आणि बेसुमार वृक्षतोडीमुळे निसर्गाचा समतोल ढासळला असून, जागतिक तापमान वाढीमुळे उष्णतेच्या लाटांची वारंवारता आणि तीव्रता दोन्ही आता नियंत्रणाबाहेर गेल्या आहेत. पूर्वी मे महिन्यात जाणवणारे उन्हाचे चटके आता मार्च–एप्रिलमध्येच अंगाची लाहीलाही करत आहेत. मार्च महिन्यातच तापमानाचा पारा ४० अंशांच्या पार जाणे, ही धोक्याची घंटा मानली जात होती. दिल्ली, उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये तर अनेक ठिकाणी तापमान ४७ – ४८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. ज्यामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.वाढत्या धोक्यामुळे सरकारकडून अनेक जिल्ह्यांत 'येलो अलर्ट' जारी केला आहे. उष्माघात हा या हवामान बदलाचा सर्वात घातक परिणाम आहे. वाढत्या उष्णतेमुळे शरीराची तापमान नियंत्रण प्रणाली कोलमडते, ज्यामुळे गंभीर आजार किंवा मृत्यू ओढवू शकतो. सरकारी आकडेवारीनुसार, गेल्या दशकात देशात उष्णतेमुळे हजारो नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. शेतमजूर, बांधकाम कामगार आणि रस्त्यावरील विक्रेते यांसारख्या उघड्यावर काम करणाऱ्या वर्गाला याचा सर्वाधिक फटका बसत आहे. उष्णतेचे हे संकट केवळ आरोग्यापुरते मर्यादित नाही. कडक उन्हामुळे शेतीतील पिकांचे नुकसान होत आहे, ज्यामुळे अन्नसुरक्षेचा प्रश्न निर्माण होतोय. तसेच, वाढत्या वीज वापरामुळे ऊर्जेची टंचाई निर्माण होऊन वीज कपात करावी लागत आहे. 'श्रम उत्पादकता' कमी झाल्यामुळे देशाच्या जीडीपीवरही याचा नकारात्मक परिणाम होत असल्याचे जागतिक अहवाल सांगतात. उष्णतेमुळे पिकांवर ताण येतो आणि पाण्याची मागणी वाढते. हिमालयातील बर्फ वितळण्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे नद्यांच्या पाणीपुरवठ्यावरही परिणाम होत आहे. राज्यातील विदर्भात, विशेषतः अकोला येथे तापमान ४६.९ओ सेल्शिअसवर गेल्याने सध्या विदर्भ हा उष्माघाताचा 'हॉटस्पॉट' ठरला आहे. महाराष्ट्रात २०२६ च्या उन्हाळ्यात आतापर्यंत उष्माघातामुळे ७ ते ८ जणांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. परभणीत ३७ वर्षीय व्यक्तीचा उष्माघाताने मृत्यू झाला असून, अहिल्यानगरात ४५ वर्षीय महिला शेतकरी शेतात काम करताना दगावली. नागपूर जिल्ह्यात बसने प्रवास करणाऱ्या ६५ वर्षीय प्रवाशाचा मृत्यू झाला, अशी उदाहरणे देता येतील. उष्णतेच्या लाटांमुळे शरीरातील पाणी कमी होणे (डिहायड्रेशन), उष्माघात आणि मृत्यूच्या प्रमाणात वाढ झाली आहे. सध्याच्या परिस्थितीत स्वतःची काळजी घेणे, मुक्या प्राण्यांसाठी पाण्याची सोय करणे आणि ऊन टाळून कामे करणे, हेच आपल्या हातात आहे. आरोग्य विभागाने दुपारी घराबाहेर न पडण्याचे, सुती कपडे वापरण्याचे आणि भरपूर पाणी पिण्याचे आवाहन केले आहे. मात्र, केवळ तात्पुरत्या उपाययोजनांनी हे संकट टळणारे नाही, हेही तितकेच महत्त्वाचे आहे. जागतिक तापमान वाढीमुळे पृथ्वीचे सरासरी तापमान वाढत आहे, ज्याचा थेट परिणाम भारताच्या उन्हाळ्यावर होत आहे. दुपारी १२ ते ४ या वेळेत रस्त्यावर शुकशुकाट पाहायला मिळत असल्याने अनेक शहरात 'अघोषित संचारबंदी' अनुभवला मिळत आहे. पॅसिफिक महासागरातील पाण्याच्या तापमानातील बदलांमुळे मान्सूनवर परिणाम होऊन उष्णतेची तीव्रता वाढली आहे. उष्माघाताचे संकट हे निसर्गाचे एक प्रकारची प्रतिक्रिया आहे. आपण निसर्गाचा जो समतोल बिघडवला आहे, त्याचे परिणाम आता आपण भोगत आहोत. जर आपण आताच कार्बन उत्सर्जन कमी करणे आणि निसर्ग संवर्धनाकडे लक्ष दिले नाही, तर भविष्यातील पिढ्यांसाठी हा उन्हाळा अधिक असह्य आणि प्राणघातक ठरेल.

# करंजाडेच्या काळजावर राडारोड्याचे घाव 'लोकशाही'च्या वाघांचा भूमाफियांवर जबरदस्त प्रहार!

## महाराष्ट्र अध्यक्ष डॉ.मुनीर तांबोळी जिल्हा अध्यक्ष विकास पाटील यांच्या नेतृत्वाखाली पत्रकारांचा एल्गार

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

आजच्या या सिमेंटच्या जंगलात माणुसकी तर हरवली आहेच, पण आता माणसाने आई समान असलेल्या निसर्गाचाही गळा घोटायला सुरुवात केली आहे! करंजाडे–नांदगावच्या त्या देखण्या डोंगराच्या कुशीत मुंबईचा घाणेरडा 'राडारोडा' आणून टाकताना या कंत्राटदारांना आणि भूमाफियांना शरम कशी वाटत नाही? निसर्गाचा हा उघड्या डोळ्यांनी होणारा खून आम्ही पाहत बसायचा का? हाच का तुमचा विकास आणि हीच का तुमची नीतिमत्ता?

**निसर्गाची कबर बांधणाऱ्यांना 'लोकशाही'चा जाब!**

मुंबईतील टोलेजंग इमारतींच्या नावाखाली निघालेला तो विषारी राडारोडा आज करंजाडेच्या डोंगराच्या पायथ्याशी खच घातला जातोय. एमपीसीबीची कोणतीही परवानगी नाही, कोणतीही प्रक्रिया नाही; बस, उचलला ढिगारा आणि टाकला निसर्गाच्या कुशीत! यामुळे डोंगरावरून येणारे नैसर्गिक जलप्रवाह रोखले गेले आहेत. उद्या पावसाळ्यात गावेच्या गावे पाण्याखाली गेली किंवा भूस्खलन होऊन कोणाचा बळी गेला, तर त्याचे पाप कोणाच्या कपाळावर? या पापाचा पाढा वाचण्यासाठीच आज केंद्रीय लोकशाही पत्रकार संघाचे शिष्टमंडळ थेट प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या दारात धडकले!



**डॉ. मुनीर तांबोळी यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाचा कडाडा!**

या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यासाठी संघटनेचे महाराष्ट्र अध्यक्ष डॉ. मुनीर तांबोळी यांच्या कणखर नेतृत्वाखाली एक वजनदार शिष्टमंडळ आज मैदानात उतरले होते. यात जिल्हा अध्यक्ष विकास पाटील, जिल्हा सचिव अभिजित दरेकर, जिल्हा उपाध्यक्ष संकेत घेवारे, सदस्य आशिष मोहोकर या लोकशाहीच्या शिलेदारांनी प्रशासनाला धारेवर धरले. निसर्ग संपला तर तुम्ही तरी कुठे वाचणार? असा जळजळीत सवाल या पत्रकारांनी उपस्थित केला.

**संजय भोसले यांच्याकडून कारवाईचा 'हुकूम'!**

या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून शिष्टमंडळाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी संजय भोसले यांची भेट घेतली आणि त्यांना कारवाईचे पत्र देऊन जाब विचारला. भोसले साहेबांनीही या आक्रमक पवित्र्यापुढे नमते घेत तात्काळ चक्रे फिरवली आहेत. त्यांनी सिडकोच्या अधिकाऱ्यांना पत्र लिहून 'संयुक्त पाहणी' करण्याचे आणि दोषींवर कठोर दंडात्मक कारवाई करण्याचे स्पष्ट आश्वासन शिष्टमंडळाला दिले आहे.

**भूमाफियांनो, आता तुमची खैर नाही!**

हा केवळ एक तक्रार अर्ज नाही, तर हा निसर्गाच्या रक्षणासाठी पुकारलेला रणसंग्राम आहे! जर हे अनधिकृत डम्पिंग तातडीने थांबले नाही आणि त्या निर्दयी कंत्राटदारांना बेड्या पडल्या नाहीत, तर डॉ. मुनीर तांबोळी आणि त्यांचे सहकारी स्वस्थ बसणार नाहीत. आता सिडको आणि एमपीसीबी या संयुक्त मोहिमेत काय दिवे लावते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

निसर्ग वाचला तरच माणूस वाचेल, अन्यथा या राडारोड्यात तुमची माणुसकी आणि प्रशासन दोन्ही गाडले गेल्याशिवाय राहणार नाही, हे विसरू नका!

# महिला सक्षमीकरणाचा उत्सव

## धडक वूमन एम्पॉवर असोसिएशनकडून 'डीडबल्यूईए एक्सलन्स अवॉर्ड्स' ने ३० महिलांचा सन्मान

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त धडक कामगार युनियन महासंघ अंतर्गत कार्यरत धडक वूमन एम्पॉवर असोसिएशन च्या वतीने आयोजित भव्य कामगार मेळाव्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ३० महिलांना 'डीडबल्यूईए एक्सलन्स अवॉर्ड्स' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. या सोहळ्याचे मार्गदर्शन प्रख्यात कामगार नेते अभिजीत राणे यांनी केले. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून मुंबई उत्तर पश्चिमचे खासदार रवींद्र वायकर, भाजपा ज्येष्ठ नेते कृपाशंकर सिंह, गोरेगावच्या आमदार विद्या ठाकूर, भाजपा नेते जयप्रकाश ठाकूर, भाजपा मुंबई सरचिटणीस विनोद शेलार, भाजपा मुंबई सचिव अखिलेश चौबे आदी मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमात शिखा नायर (वॉटर मॅनेजमेंट), अर्चना भांडारकर (मेनोपॉज कोच), प्रियांका पांड्या (लाईफ कोच), कल्पिता नायडू (वेलनेस प्रॉडक्ट्स अँड हीलिंग सर्व्हिसेस), डॉ. प्रणोती कुकाडिया (योगा थेरपिस्ट), प्रिती मेहता (डिजिटल स्ट्रॅटेजिस्ट), मीता झुंझुनवाला



(इंटिमसी अँड होलिस्टिक हेल्थ कोच), डॉ. पूजा (अकॅडेमिशियन व मेंटर कोच), डॉ. राधिका अग्रवाल (डेंटिस्ट/स्किन/हेअर कॉस्मेटोलॉजिस्ट), भाविनी शेटिया (नॅचुरोपॅथ व योगा इन्स्ट्रक्टर), जेन गिलियन रॉड्रिग्ज (हियरिंग एड सेंटर्स व होमस्टेज), कुंतल चेतन सोनपाल (प्राणिक हीलर व ट्रेनर), मधुलीका अरोरा (फ्लोरल डिझायनर), कीर्ती गुप्ता (ज्वेलरी मॅन्युफॅक्चरिंग), गायत्री जोशी (ब्युटी अँड वेलनेस कोच), संगीता अग्रवाल (संस्थापक – अग्रिम अग्रवाल फाउंडेशन, मेंटल हेल्थ अँड डी–ॲडिक्शन), कल्पना मितल मंगल (फ्लोरल डिझायनर व इव्हेंट डेकोरेटर), ॲड. प्रेमलता जैन (प्रॉपर्टी लॉयर), डॉ. सायली कुलकर्णी (हायजिन एक्स्पर्ट), प्रियांका टोपले (सिल्व्हर ज्वेलरी रिटेलर), मृणोती पुजारी (अल्केमिस्ट, गौकला), सचिन बांगेरा (पास्ट लाईफ रिग्रेशन थेरपिस्ट व रेकी ग्रँड मास्टर), रमेश वांजा (इंटेरिअर वर्क), मानव गुप्ता (फायनान्शियल ॲडव्हायझर), नरेश पंजनानी (लाईफ, हेल्थ अँड डिसॅबिलिटी इन्शुरन्स), डॉ. प्रवीण के. दिवाकर (नॅचुरोपॅथ), मोहित बांगरे (पेस्ट कंट्रोल व हायजिन प्रॉडक्ट्स), प्रग्नेश सद्राणी (म्युच्युअल फंड व इन्शुरन्स), ममता शर्मा (फेमीफोर्स होम केअर सर्व्हिस), मधु मेहता (ॲस्ट्रोलॉजर व न्यूमरोलॉजिस्ट) यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी कामगार नेते अभिजीत राणे म्हणाले, समाजात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा सन्मान करणे ही केवळ औपचारिकता नसून, त्यांना पुढील वाटचालीसाठी प्रोत्साहन देण्याची जबाबदारी आहे. DWEA च्या माध्यमातून अशा प्रेरणादायी महिलांना व्यासपीठ देत आहोत, ही अभिमानाची बाब आहे.

कार्यक्रमाचे नियोजन करणाऱ्या धडक वूमन एम्पॉवर असोसिएशनच्या युनिट अध्यक्ष चैताली चॅटर्जी यांनी सर्व मान्यवर, पुरस्कार विजेत्या महिला व उपस्थितांचे आभार मानत, या कार्यक्रमाला मिळालेला प्रतिसाद महिलांच्या सक्षमीकरणासाठी आमच्या प्रयत्नांना अधिक बळ देणारा आहे. सर्वांच्या सहकार्यामुळेच हा सोहळा यशस्वीरीत्या पार पडला, असे सांगितले.हा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला असून, महिलांच्या कार्याचा गौरव करण्याबरोबरच समाजात सकारात्मक प्रेरणा निर्माण करणारा ठरला.

# घरफोडी करणारा ५ लाख ८१ हजारांचा मुद्देमालासह अटकेत

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंब्रा परिसरात घरफोडी करून लाखोंचा मुद्देमाल चोरणाऱ्या एका आरोपीला मुंब्रा पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. अल्ताफ शनावर शेख (वय १९, रा. मुंब्रा) असे त्याचे नाव आहे. या कारवाईत पोलिसांनी ३ तोळे सोन्याचे दागिने आणि १ लाख ९६ हजारांची रोकड असा एकूण ५ लाख ८१ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या कामगिरीमुळे मुंब्रा परिसरातील एका मोठ्या गुन्ह्याची उकल झाली आहे. २६ एप्रिल रोजी मोहम्मद सोदू इस्लाम खान (वय २९, रा. मुंब्रा) हे आपल्या कुटुंबासह कामानिमित्त बाहेर गेले होते. यावेळी अज्ञाताने त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि ३ तोळे सोन्याचे दागिने व रोकड असा एकूण ५ लाख ८१ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून



नेला होता. याप्रकरणी मुंब्रा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. मुंब्रा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि/विनायक माने यांच्या पथकाने तपासाची सूत्रे हाती घेतली. परिसरातील १०० ते १५० सीसीटीव्हीची तपासणी आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपीस अटक केली आहे.

# ठाण्यात ६ वाहनांच्या विचित्र आपघातात ऐक गंभीर

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

ठाण्यात आज दुपारी १:४७ वाजताच्या सुमारास नितीन ब्रिज जवळ, टाटा मोटर शोरूम समोर, नितीन कंपनी, नाशिक–मुंबई रोड, ठाणे (प.). या ठिकाणी नाशिक कडून ठाण्याकडे येणाऱ्या रोडवरती नितीन कंपनी ब्रिज उतरताना एका पाठोपाठ एका वाहनांनी पाठीमागून धडक दिल्यामुळे एकूण–०६ चारचाकी वाहनांचा अपघात झाला होता. सदर घटनास्थळी वाहतूक पोलीस अधिकारी व कर्मचारी, नौपाडा पोलीस अधिकारी व कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी ०१–पिकअप वाहनासह, अग्निशमन दलाचे जवान ०१–इमर्जन्सी वाहनासह व ०१–रेस्क्यू वाहनासह, ठाणे महानगरपालिका आरोग्य विभागाचे कर्मचारी ०१–



रुग्णवाहिकेसह उपस्थित होते.सदर घटनास्थळी TATA Indra V-20 Tampo MH 04 MR 2839 या टेम्पो चालकाच्या डाव्या पायाला व डाव्या हाताला गंभीर दुखापत झाली आहे. दुखापत झालेल्या१) श्री. सेख शाबीर महमूद (पू./वय–२२ वर्षे सदरच्या अपघातामध्ये या व्यक्तीच्या डाव्या पायाला व हाताला गंभीर दुखापत झाली असून, पुढील उपचारासाठी त्या व्यक्तीला पोलीस कर्मचारी यांच्या उपस्थितीमध्ये जिल्हा शासकीय रुग्णालय, ठाणे येथे दाखल करण्यात आले आहे.

# पशुवैद्यकीय पदवीधर असूनही सफाई कर्मचाऱ्याची नोकरी; १ मे रोजी विजय कांबळे यांचा पुरस्काराने सन्मान

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

संगमेश्वर तालुक्यातील धामणी गावचे विजय कांबळे यांनी पशुवैद्यकीय पदवी संपादन करूनही नोकरीच्या संधी उपलब्ध न झाल्याने सफाई कर्मचारी म्हणून काम स्वीकारले आहे. परिस्थितीशी संघर्ष करत त्यांनी पोटासाठी कोणतेही काम करताना कमीपणा वाटून घेऊ नये हा आदर्श समाजासमोर ठेवला आहे.

याच जिद्दीची आणि मेहनतीची दखल घेत लोकनिर्माण प्रतिष्ठान आणि लोकनिर्माण वृत्तपत्र यांच्या वतीने १ मे महाराष्ट्र दिनानिमित्त विजय कांबळे यांचा 'गुणवंत कामगार' म्हणून सन्मान करण्यात आला.

लोकनिर्माण प्रतिष्ठान आणि लोकनिर्माण वृत्तपत्र यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे महाराष्ट्र दिन




आणि जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांना हिरकणी पुरस्कार, तसेच कार्यक्षम अधिकारी आणि गुणवंत कामगारांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी विजय कांबळे यांच्या संघर्षमय प्रवासाचे कौतुक करण्यात आले. उच्च शिक्षण असूनही सध्या ते तालुक्यातील देव धमापूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात सफाई कर्मचारी म्हणुन काम करत आहेत.फावल्या वेळेत ते आपल्या शिक्षणाचा आणि अनुभवाच्या जोरावर गावातील पशुधनाची (पाळीव प्राणी )विना मोबदला सेवा करत असतात.कोणतेही काम लहान नसते, मेहनत आणि प्रामाणिकपणा हाच खरा सन्मान मिळवून देतो, हे त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध करून दाखवले.अस्या या गुणवंत कामगारांची दखल लोकनिर्माण वृत्तपत्र आणि लोकनिर्माण प्रतिष्ठान यांनी घेतली आणि त्यांचा गुणवंत कामगार म्हणुन मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मान करणेत आला.हा सन्मान सोहळा सदुरू वाचनालय देवरूख येथे आयोजित करणेत आला होता.यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री, बाळकृष्ण कासार,कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री, दादा अणेरावं,देवरुखच्या तहसीलदार श्रीम, अमृता साबळे,सहाय्यक गटविकास अधिकारी विनोदकुमार शिंदे, देवरुखच्या नगराध्यक्षा श्रीम, मृणाल शेट्ये आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे नियोजन आणि सूत्रसंचलन लोकनिर्माणचे कार्यकारी संपश्रदक यु युत्सु आर्ते यांनी केले.

# कार्य संस्कृतीची जोपासना व कर्तव्य पालन केल्यासच राष्ट्र सामर्थ्यशाली बनेल-डॉ.विठ्ठलराव लहाने

## कै.नारायणरावजी चिद्रावार स्मृती व्याख्यानमालेत प्रतिपादन

दैनिक वादळ वार्ता

**देगलूर । संतोष चिद्रावार लोणीकर**

आपल्या भारत देशाला वैभवशाली संस्कृतीचा वारसा लाभलेला असून भारतातील प्रत्येक नागरिकांने कार्य संस्कृती व कर्तव्याचे पालन समर्पित भावनेने केल्यास राष्ट्र सामर्थ्यशाली बनेल व भविष्यकाळात आपला देश एक विकसित राष्ट्र निर्माण होन्यास वेळ लागणार नाही.

त्यासाठी प्रत्येकाने कार्य संस्कृतीची जोपासना करून आपली जबाबदारी समजून घेतली पाहिजे व जास्तीत जास्त चांगले काम समर्पित भावनेने करण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे प्रतिपादन जागतिक कीर्तीचे प्लास्टिक सर्जन व प्रख्यात वक्ते डॉ. विठ्ठलराव लहाने

यांनी केले आहे .ते देगलूर येथे जेष्ठ समाजवादी नेते कै.नारायणराव चिद्रावार स्मृती व्याख्यानमालेत ४० वे पुष्प गुंफताना बोलत होते.

व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष लक्ष्मीकांत पदम्वार हे होते.तर व्यासपीठावर निजामबाद विधानसभा मतदार संघाचे आमदार धनपाल सूर्यनारायण गुप्ता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक तथा मा उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव बालाजीराव पाटील ख़तगावकर व व्याख्यानमाला संयोजक डॉ. किरण चिद्रावार। उपस्थित होते.

प्रारंभी प्रा. सोमनाथ पवार व प्रकाश सोनकांबळे यांच्या स्वागत गीताने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कै.नारायणराव चिद्रावार यांच्या प्रतिमेचे पूजन व दिप प्रज्वलन करून व्याख्यानमालेस प्रारंभ करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकपर भाषणातून श्री किरण चिद्रावार यांनी कै.नारायणराव चिद्रावार यांच्या जीवन काळातील विविध क्षेत्रातील विकास कामाचा आढावा घेतला. त्यात अडत व्यापारी शिक्षण संस्थेची व देगलूर

महाविद्यालयाची स्थापना करून गरीब शेतकरी व शेतमजुरांच्या मुलामुलींसाठी उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली.नगरेश्वर मंदिर ,राघवेंद्र स्वामी मंदिर स्थापन केल्याचा उल्लेख केला. अल्पसंख्यांक लोकांसाठी मौलाना



आझाद उर्दू हायस्कूल स्थापन केले.

त्यांच्या काळात नगर परिषदेमार्फत केलेले विकास कामाची माहिती दिली. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले बालाजी पाटील खतगावकर यांनी देगलूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी म्हणून त्यांनी अनुभवलेल्या आणि विकास कामाचा देखील सविस्तर उल्लेख केला. देगलूर शहर व येथिल परिसराच्या सर्वांगीण विकसात चिद्रावार परिवाराच्या योगदानाचा गौरवाने उल्लेख केला. निजामबादचे आमदार धनपाल सूर्यनारायण गुप्ता यांनी देखील चिद्रावार परिवार हा आदर्श परिवार असुन आमचे कौटुंबिक नातेसंबंध निर्माण झाले यासाठी मी स्वतःला भाग्यशाली समजतो असेही गौरवोद्गार काढले.

अध्यक्षीय समारोप करताना लक्ष्मीकांत पदमवार यानी कै नारायणराव चिद्रावार यांच्या जीवनवर प्रकाश टाकून त्यांचा समाजवादी वारसा व विविध समाज उपयोगी कामे करण्याची प्रेरणा मिळाली प्रतिपादन केले.डॉ. विठ्ठलराव लहाने यांनी आपल्या जीवनातील अनेक अनुभव प्रतिपादन करून जीवनामध्ये यशस्वी व्हायचे असेल तर जबाबदारीचे तत्व, सातत्य , चांगली पात्रता निरीक्षणात्मक दृष्टी , सचोटी, निरीक्षण, स्वच्छता आणि शिस्त असणे महत्त्वाचे असल्याचे नमूद केले.जोपर्यंत प्रत्येक व्यक्ती आपल्या कुटुंबामध्ये अधिक वेळ देणार नाही, कुटुंबात असलेले नातेसंबंध जपणार नाही तोपर्यंत त्याच्या जीवनात खरा आनंद मिळणार नाही असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.बी.आर.कतुरवार यांनी केले तर आभार प्रा संग्राम पाटील यांनी मानले. कार्यक्रमास देगलूर शहरातील

प्रतिष्टीत नागरिक अ.व्या.शि.संस्थेचे अध्यक्ष श्री प्रकाश पाटील बेमब्रेकर , कोषाध्यक्ष विलास तोटावार, कार्यकारी मंडळ सदस्य सूर्यकांत नारलावार , देवेंद्र मोतेवार, रवींद्र अपा द्याडे, चंद्रकांत नारलावार, प्राचार्य डॉ मोहन खताळ, महेश पाटील , डॉ. भूमे, डॉ. संतोष चिंतलवार, अविनाश कोडगीरे, अविनाश हासनाळकर, डॉ. रवींद्र चीद्रावार, उपप्राचार्य डॉ.अनिल चीद्रावार , उपप्राचार्य डॉ. व्ही जी शेरीकर, उपप्राचार्य एम एम पटेल प्रकाश चिद्रावार , गिरीश चिद्रावार, गुरुराज चिद्रावार व वल्लभ चिद्रावार यांच्यासह बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

# हदगाव तालुक्यातील नागरिकांनी जास्तीत जास्त स्व-गणना करावी:तहसीलदार सय्यद उमर यांचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता

**हदगाव । चंद्रकांत भोरे**

शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या महत्त्वाकांक्षी गणना मोहिमेत नागरिकांचा सहभाग वाढवण्यासाठी आता प्रशासनाने कंबर कसली आहे. तालुक्यातील प्रत्येक नागरिकाने या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवून आपली आणि आपल्या कुटुंबाची 'स्व-गणना प्राधान्याने पूर्ण करावी, असे आवाहन तहसीलदार सय्यद उमर यांनी केले आहे.डिजिटल नोंदणीवर भर तहसील कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत तहसीलदार बोलत होते. यावेळी त्यांनी स्पष्ट केले की, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिक आता स्वतःची माहिती स्वतः ऑनलाइन पद्धतीने नोंदवू शकतात.




यामुळे गणनेच्या कामात पारदर्शकता येईल आणि वेळेचीही बचत होईल.

स्व-गणना ही केवळ एक शासकीय प्रक्रिया नसून, भविष्यातील नियोजनासाठी अत्यंत महत्त्वाचा आधार आहे. तालुक्यातील नागरिकांनी कोणत्याही तांत्रिक अडचणीची भीती न बाळगता पोर्टलवर जाऊन आपली माहिती अचूकपणे भरावी.

मोहिमेची ठळक वैशिष्ट्ये:

सुलभ प्रक्रिया: नागरिक घरी बसून मोबाईल किंवा संगणकाद्वारे माहिती भरू शकतात.

वेळेची बचत: प्रगणक घरी येण्याची वाट न पाहता नागरिक सोयीनुसार नोंदणी करू शकतात.

गोपनीयता: नागरिकांनी दिलेली माहिती पूर्णपणे सुरक्षित आणि गोपनीय राहील.व काही शंका असल्यास संबंधित तलाठी किंवा ग्रामसेवक यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

तालुक्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी या डिजिटल मोहिमेचा लाभ घेऊन प्रशासनाला सहकार्य करावे, जेणेकरून तालुक्याच्या विकासाचा अचूक आराखडा तयार करण्यास मदत होईल, असेही तहसीलदार सय्यद उमर यांनी शेवटी नमूद केले.

# जीवघेण्या मारहाणीचा गुन्हा; दोन आरोपी फरार, राजुरा पोलिसांची शोधमोहीम तीव्र

दैनिक वादळ वार्ता

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राजुरा तालुक्यातील आर्वी येथे घडलेल्या गंभीर मारहाणीच्या घटनेनंतर दोन आरोपी फरार झाले असून, त्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी व्यापक मोहीम सुरू केली आहे.

या प्रकरणी अपराध क्र. ५७६/२०२५ अंतर्गत भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९, ३५१(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, जयराम रामेश्वर राठोड आणि सोनी जयराम राठोड (दोन्ही रा. आर्वी, ता. राजुरा, जि. चंद्रपूर) यांनी जखमी आकलन भोसले यांच्यावर जिवे मारण्याच्या उद्देशाने गंभीर मारहाण केली. घटनेनंतर दोन्ही आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू आहे.



आरोपींचे वर्णन जाहीर करण्यात आले असून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जयराम राठोड हा मजबुत बांध्याचा, सावळ्या रंगाचा, सुमारे ५ फूट ५ इंच उंचीचा असून बारीक डोळे, काळे केस व बारीक दाढी-मिशी अशी ओळख आहे.

तर सोनी राठोड ही मजबुत बांध्याची, काळा-सावळ्या रंगाची, सुमारे ५ फूट उंच, गोल चेहरा व टपोरे डोळे अशी वैशिष्ट्ये आहेत.

घटनेनंतर परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. पोलिसांनी गस्त वाढवून परिस्थिती नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

दरम्यान, आरोपींबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास तात्काळ पोलिसांना कळविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

=न्न संपर्कासाठी:

पोलीस निरीक्षक सुमीत परतेकी - ७७२२००८७४७

पोलीस उपनिरीक्षक अतुल राठोड - ८८८८१५५५९१

पोलीस नियंत्रण कक्ष, चंद्रपूर - ०७१७२-२५१२०० / ११२

# प्रियांशी आशाराम जामनेरकर उरण तालुक्यातून प्रथम

## सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव

दैनिक वादळ वार्ता

**उरण । प्रतिनिधी**

बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी निकालाचा दिवस तसा कौतुकाचा आणि आनंदाचा होता सर्वत्र गुणवंत विद्यार्थ्यांवर अभिनंदनचा वर्षाव होत असताना अकोला जिल्ह्यातील अनकवाडी या छोट्याशा गावातील कुमारी प्रियांशी आशाराम जामनेरकर या विद्यार्थिनीने मुंबईत विभागातील उरण या तालुक्यात आपली बाजी मारली आहे. उरण येथील सिटीजन हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेजमध्ये ८७.५०% गुण घेत घवघवीत यश प्राप्त करून सायन्स शाखेतून उरण तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. या उपेक्षित गुणवंत विद्यार्थिनीचे नाव कुमारी प्रियांशी आसाराम जामनेरकर असून सिटीजन



हायस्कूल ज्युनिअर कॉलेज उरण येथे शिक्षण घेऊन शिक्षक सादिक सर, शैलेंद्र प्रजापती, नरेंद्र पाटील ,प्रमोद पाटील , व साजिया मामी यांच्या मार्गदर्शनाखाली व विवेकानंद येथील कोचिंग क्लासेस मध्ये शिक्षक दत्तात्रय शेळके , मयूर पाटील,आदित्य सर यांचे मार्गदर्शन घेऊन उत्तम अभ्यास करून तालुक्यातील पहिला क्रमांक पटकावला आहे. प्रियांशी चे वडील शेतकरी असून उरण येथे एसटी बस चालक आहेत व आईचे वडापावचे दुकान आहे.तिने दहावीपर्यंत जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट मध्ये शिक्षण घेतले. स्नितिल पडते यांच्या मार्गदर्शनाखाली तिसरा क्रमांक दहावीत पटकावला होता. पुढे प्रियांशीला इंजीनियरिंग करायची आहे असे तिथे ठरविले आहे. कम्प्युटर सायन्स किंवा आर्टिफिशल इंटेलिजन्स या ब्रांच मध्ये पुढचे करिअर तिला करायचे आहे. सायन्स शाखेतून प्रियांशी आशाराम जामनेरकर ही उरण तालुक्यातून प्रथम आल्याने तिच्यावर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# संदिप पिल्लेवाड यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार जाहीर

दैनिक वादळ वार्ता

**मुखेड । प्रतिनिधी**

निर्भीड व निःपक्ष पत्रकारितेसाठी ओळख निर्माण केलेले पत्रकार संदीप पिल्लेवाड यांना यंदाचा राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही राज्यभरात कार्यरत असलेल्या दैनिक लोकनेता या वृत्तपत्राच्या वतीने हा पुरस्कार घोषित करण्यात आला आहे.



संदीप पिल्लेवाड यांनी सन २०१७ पासून पत्रकारिता क्षेत्रात कार्याची सुरुवात केली. विविध वृत्तपत्रांच्या माध्यमातून काम करत असताना त्यांनी नेहमीच सत्य व वस्तुनिष्ठतेला प्राधान्य दिले. त्यांच्या पत्रकारितेची वैशिष्ट्ये म्हणजे निर्भीड मांडणी, निःपक्ष भूमिका आणि समाजातील वंचित, पीडित व शोषित घटकांचे प्रश्न ठळकपणे मांडण्याची जिद्द. गेल्या काही वर्षांत त्यांनी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक तसेच आरोग्य क्षेत्रातील अनेक महत्त्वाचे मुद्दे आपल्या लेखनातून पुढे आणले. त्यामुळे त्यांच्या कार्याची दखल विविध स्तरांवर घेतली जात आहे. पत्रकारितेबरोबरच सामाजिक व राजकीय क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे.

दैनिक लोकनेता वृत्तपत्राच्या वर्धापन दिनानिमित्त हा पुरस्कार जाहीर करण्यात आला असून, येत्या १० मे रोजी ऋतढ कृषीकुल, शिरसाळा (जि. बीड) येथे आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात मान्यवरांच्या उपस्थितीत संदीप पिल्लेवाड यांना सन्मानित करण्यात येणार आहे. हा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर संदीप पिल्लेवाड यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, पत्रकारिता क्षेत्रातील त्यांच्या कार्याचे कौतुक व्यक्त केले जात आहे.

## हदगाव शहर व ग्रामीण भागात खुलेआम अवैध गुटखाविक्री सुरु अन्न औषध प्रशासनाचे दुर्लक्ष

# शहरासह ग्रामीण भागातील सर्व पानटपरी वरील गुटखा जप्त करण्यात यावा सर्व सामान्य जनतेची मागणी

दैनिक वादळ वार्ता

**हदगाव । प्रतिनिधी**

राज्यात २०१२ पासून गुटखा विक्रीस बंदी घातली असूनही नांदेड जिल्यातील हदगाव शहरामध्ये व तालुक्यात राजरोसपणे अवैध गुटख्याची चार चाकी बोलेरो पीकअप , आयचर या वाहनाद्वारे हिमायतनगर व इतर ठीकाणाहुन आयात करून हदगाव शहरासह ग्रामीण भागात विविध कंपणीचा विमल , राजनिवास , सितार, मुसाफिर, नजर, गोवा, सितारू,रजनीगंधा इत्यादि जीवघेण्या गुटखा, सुगंधी तंबाखूची व बिडी सिगारेट ची खुलेआम विक्री मागील अनेक वर्षा पासुन होत आहे तरी देखील संबंधित विभागातील अधिकारी यांचे या कडे जाणीव पुर्वक दुर्लक्ष होत आहे की काय असा प्रश्न सर्वसामान्य जनतेत निर्माण झाला आहे या जीवघेण्या अवैध गुटख्याच्या धंद्यात दररोज लाखोंची उलाढाल होत असल्याचे पाहावयास मिळत आहे अन्न व औषध प्रशासन लक्ष्मी दर्शनाच्या माध्यमातून धृतराष्ट्राची भूमिका घेत गुटखा तस्कर यांची पाठराखण करीत असल्याचे पाहावयास मिळत आहे हिमायतनगर या शहरातून व इतर ठिकाणहून चार चाकी वाहनाच्या माध्यमातून हदगाव शहरात मोठ्या प्रमाणात अवैध गुटख्याची मध्यरात्री व सकाळी तीन ते चारच्या सुमारास आयात केली जात असल्याची चर्चा जोर धरत आहे. हिमायतनगर हदगाव या दोन ठिकाणावरून अनेक शहरासह ग्रामीण भागात विविध प्रकार चा अवैध गुटखा दोनचाकी व चारचाकी वाहनाच्या माध्यमातून पोहोचविला जात आहे हदगाव शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागातील सर्वच किराणा दुकान , हॉटेल , कॅन्टींग , पान टपरी धारकाच्या दुकानासमोर गुटखा तस्करांचे एजेंट मोटरसायकल उभी करून त्यांना गुटका, तंबाखू व बिडी, सिगारेट पोहोचवीतो दर्शनी भागात तर सर्व प्रकारच्या गुटख्याची माळ लावून राजरोसपणे विक्री केल्या जाते हा सर्व प्रकार अन्न व औषध प्रशासन




अर्थपूर्ण संबंध जोपासत कार्यवाही करण्यास धजावत नाही. गुटख्यात असलेल्या मॅग्नेशियम कार्बोनेट सारख्या घातक घटकांमुळे कर्करोगासारखा गंभीर आजार होण्याची शक्यता आहे तंबाखूजन्य पदार्थामुळे नागरिकांचे आरोग्य बिघडू नये यासाठी राज्य सरकारने २०१२ मध्ये गुटख्याच्या तंबाखूजन्य सुपारी पान मसाल्याच्या पदार्थाची निर्मिती आणि विक्रीवर बंदी घातली आहे. तरी देखील हदगाव शहरासह तालुक्यात खुलेआम गुटखा विक्री राजरोस पणे सुरू असुन प्रशासन म्हणते गुटखा बंद आहे सरकार म्हणते गुटखा विकणाऱ्या वर मकोका ( मकोका ) लावू पण प्रत्यक्षात मात्र तसे होतांना दिसत नाही त्यामुळे संबंधित आधिकारी यांचे गुटखा माफीया कडे जाणीव पुर्वक दुर्लक्ष होत आहे की काय असा प्रश्न सर्व सामान्य जनतेत निर्माण झाला आहे गुटखा बंद करायचाच असेल तर सर्व प्रथम पान टपरी वरील गुटखा जप्त करण्यात यावा त्यानंतर गोळी भांडार, चाय कँटीन, किराणा अशा सर्व ठिकाणी अन्न व औषध प्रशासन विभागाने स्वतःहा प्रत्यक्षात जाऊन कार्यवाही करावी म्हणजे गुटखा माफीया कडून गुटख्याच्या दररोज होणाऱ्या खरेदी विक्री ला आळा बसेल असे काही सुज्ञ लोकांमध्ये बोलल्या जात आहे

# तांबवा येथे भिमरत्न युवा प्रतिष्ठानच्या वतीने बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापनेचा सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

समाजात धम्म,समता आणि बंधुभावाचा संदेश प्रसारित करण्याच्या उद्देशाने,भिमरत्न युवा प्रतिष्ठान तांबवा यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला तथागत भगवान गौतम बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापना सोहळा अत्यंत उत्साह पूर्ण वातावरणात संपन्न झाला.या मंगल प्रसंगी आयोजित विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांना गावकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. गावातून भव्य मिरवणूक आणि मूर्ती प्रतिष्ठापना कार्यक्रमाची सुरुवात सकाळी तांबवा बस स्टँड ते बुद्ध विहार या मार्गावर काढण्यात आलेल्या भव्य मिरवणुकीने झाली. ढोल-ताशांचा गजर, निळ्या ध्वजांची पंढरी आणि जय भीमच्या जयघोषाने संपूर्ण परिसर भारावून गेला होता. यानंतर बुद्ध विहार येथे मंगलमय वातावरणात, विधीपूर्वक बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली.दुपारी सर्व उपस्थितांसाठी धम्मप्रसाद (अन्नदान) आयोजित करण्यात आला होता.तर सायंकाळी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली,यामुळे गावात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले.

या ऐतिहासिक सोहळ्याला राजकीय, सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून तांबवा येथील सरपंच दिपालीताई अरुण चाटे तर प्रमुख पाहुणे माजी आ. पृथ्वीराज साठे,माजी केज प.स.सभापती ऋषिकेश आडसकर, बालासाहेब जोगदंड तालुका अध्यक्ष,भारतीय बौद्ध महासभा,केज, रामधन चाटे उप सरपंच,तांबवा भिवाजी कांबळे,विष्णू कांबळे, अशोक खाडे कचरू खाडे माजी सैनिक, कचरू ओव्हाळ समाजसेवक,सदाशिव वाव्हळ,दिलीप ओव्हाळ, अभिमान शिंदे,संजीवन ओव्हाळ,संदिपान ओव्हाळ यशस्वी नियोजनात समिती व प्रतिष्ठानचे योगदान हा भव्य सोहळा यशस्वी करण्यासाठी जयंती समिती आणि भिमरत्न युवा प्रतिष्ठानच्या सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.त्यांच्या उत्कृष्ट नियोजनाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

भिमरत्न युवा प्रतिष्ठानने दाखवलेल्या या सामाजिक बांधिलकी बद्दल गावकऱ्यांनी त्यांचे विशेष आभार मानले. तसेच या प्रतिष्ठानकडून येणाऱ्या काळातही अशाच प्रकारचे लोकोपयोगी,सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबवावेत असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

जयंती समितीचे सदस्य शाहू कांबळे,अशोक ओव्हाळ,नवनाथ ओव्हाळ,नवा ओव्हाळ, भिमरत्न युवा प्रतिष्ठानचे सक्रिय सदस्य संभाजी कांबळे,गोरख ओव्हाळ,

सिद्धार्थ ओव्हाळ, सिद्धार्थ ओव्हाळ,सचिन ओव्हाळ,अंबादास ओव्हाळ,राहुल ओव्हाळ, आकाश कांबळे,महादेव लांडगे,समाधानओव्हाळ, महेश ओव्हाळ.यांनी परिश्रम घेऊन हा कार्यक्रम यशस्वी केला.



# कामगार दिनी पालिकेचे दोन कर्मचारी सन्मानित

## बांधकाम सभापती ममता बोंगाडे यांचा पुढाकार

**दैनिक वादळ वार्ता.**
**सिंदी रेल्वे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनानिमित्त येथे नगरपालिकेच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात पालिकेतील दोन चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचा हृदयस्पर्शी सत्कार करण्यात आला. बांधकाम सभापती ममता बोंगाडे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला.



यावेळी शिपाई पदावर कार्यरत हेमंत बावने तसेच पाणीपुरवठा विभागात कार्यरत राजू गीरीजापुरे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. नागरिकांच्या प्रत्येक हाकेला तत्परतेने प्रतिसाद देणारे आणि आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक राहून सेवा बजावणारे हे दोन्ही कर्मचारी पालिकेचा 'श्वास' असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.विशेषतः शहरातील पाणीपुरवठ्याची जबाबदारी सांभाळताना राजू गीरीजापुरे दररोज व्हॉल्व्ह उघडणे-बंद करणे यासारखी महत्त्वाची जबाबदारी पार पाडतात. तर हेमंत बावने हे नेहमीच नागरिकांच्या सेवेसाठी धावून जाणारे कर्मचारी म्हणून ओळखले जातात. कामाच्या दरम्यान अनेकदा रोषाला सामोरे जावे लागूनही कोणतीही नाराजी न ठेवता हसतमुखाने सेवा देणारे हे कर्मचारी खऱ्या अर्थाने सत्कारास पात्र असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. अवघ्या काही महिन्यांतच त्यांच्या कार्याची दखल घेत ममता बोंगाडे यांनी कामगार दिनी त्यांचा सन्मान करून प्रेरणादायी उदाहरण घालून दिले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष राणी कलोडे होत्या. उपाध्यक्ष अकील शेख व मुख्याधिकारी पूर्णिमा गावीत यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सर्व विषय समितीचे सभापती, नगरसेवक, नगरसेविका तसेच पालिका कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# शेगावमध्ये पेट्रोल-डिझेलचा तुटवडा; वाहनधारकांची गैरसोय

## खाजगी दुकानांत अवैधरीत्या चढ्या दराने विक्री;लुटमारीचा आरोप



**दैनिक वादळ वार्ता**
**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा तालुक्यातील शेगाव येथे पेट्रोल व डिझेलचा तुटवडा निर्माण झाल्याने वाहनधारकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. तालुक्यातील मोठी बाजारपेठ असलेल्या शेगाव गावाशी सुमारे ६० ते ७० खेडी जोडलेली असून, येथे असलेल्या दोन पेट्रोल पंपांवर मागील दोन-तीन दिवसांपासून इंधनाचा तुटवडा जाणवत आहे.

सध्या परिसरात लग्नसमारंभांची लगबग तसेच शेती हंगामातील कामांना वेग आला आहे. शेतकरी ट्रॅक्टरच्या सहाय्याने नांगरणी व वखरणीची कामे करत असून, अशा वेळी इंधन टंचाईमुळे शेतीकामांवरही परिणाम होत आहे.दरम्यान, पेट्रोल पंपांवर इंधन उपलब्ध नसल्याचा फायदा घेत काही ठिकाणी खाजगी दुकानांतून पेट्रोल व डिझेलची अवैधरीत्या चढ्या दराने विक्री होत असल्याची तक्रार पुढे येत आहे. त्यामुळे वाहनधारकांची सर्रासपणे लूट होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

या परिस्थितीमुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनाने तात्काळ लक्ष घालून इंधन पुरवठा सुरळीत करावा व अवैध विक्रीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

# आशा वर्करांच्या समस्या तात्काळ सोडवा गणेश कांबळे यांची शासनाकडे मागणी

## मानधनवाढ,कायमस्वरूपी दर्जा व सामाजिक सुरक्षा सुविधांची गरज अधोरेखित

**दैनिक वादळ वार्ता**
**सोलापूर । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था सक्षम ठेवण्यात मोलाची भूमिका बजावणाऱ्या आशा वर्कर भगिनी आज विविध समस्यांना सामोऱ्या जात असून त्यांच्या न्याय्य मागण्यांकडे शासनाने तात्काळ लक्ष द्यावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्रजी पवार) पक्षाच्या सामाजिक न्याय विभागाचे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष गणेश कांबळे यांनी केली आहे.

आशा वर्करांना अत्यल्प मानधन, वाढता कामाचा ताण, वेळेवर मोबदला न मिळणे तसेच आवश्यक शासकीय सुविधा न मिळणे या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे त्यांच्या मध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले असल्याचे कांबळे यांनी स्पष्ट केले. कोरोना काळापासून आजपर्यंत आशा वर्करांनी जीव धोक्यात घालून आरोग्य सेवा दिली आहे. गावोगावी जाऊन जनजागृती, लसीकरण, माता-बाल संगोपन तसेच विविध आरोग्य मोहिमांमध्ये त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे. मात्र, त्यांच्या कार्याच्या तुलनेत मिळणारे मानधन अत्यंत अपुरे असून अनेक वेळा ते वेळेत मिळत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

शासनाने आशा वर्करांना कायमस्वरूपी कर्मचारी दर्जा देऊन मानधनात वाढ करावी. तसेच विमा संरक्षण, निवृत्ती वेतन व इतर शासकीय सुविधा तात्काळ लागू कराव्यात, अशी मागणीही कांबळे यांनी केली.या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांची भेट घेऊन आशा वर्करांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधणार असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी पक्षाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# करमाळ्यात सामाजिक समता सप्ताहानिमित्त वक्तृत्व स्पर्धा उत्साहात

## विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग; कार्तिकी काळे प्रथम

**दैनिक वादळ वार्ता**
**सोलापूर । प्रतिनिधी**

पंचायत समिती करमाळा यांच्या वतीने १ मे महाराष्ट्र दिनानिमित्त आयोजित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह कार्यक्रमांतर्गत तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या स्पर्धेत तालुक्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आला. कार्तिकी हौसराव काळे हिने प्रथम क्रमांक पटकावला, शुभांगी संतोष कोंडलकर हिला द्वितीय, तर यशवर्धन संतोष बनसोडे याला तृतीय क्रमांक मिळाला. गायत्री शेषराव ओहोळ हिला उत्तेजनार्थ



पारितोषिक देण्यात आले.

विजेत्या विद्यार्थ्यांचा पंचायत समितीच्या सभापती पूजा ढेरे, उपसभापती अजित विघ्ने, सदस्या शिरसकर तसेच सदस्य भरत अवताडे व स्वप्नील काळे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.यावेळी गटविकास अधिकारी डॉ. अमित कदम, गटशिक्षणाधिकारी नितीन कदम, बाल विकास प्रकल्प अधिकारी किरण सूर्यवंशी, विस्तार अधिकारी जयवंत नलवडे, मिनीनाथ टकले यांच्यासह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.ही स्पर्धा गटशिक्षणाधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी केंद्रप्रमुख रमाकांत गटकळ, संजय मुंडे तसेच गटसाधन व्यक्ती शेंबडे यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमास पंचायत समितीचे सर्व सदस्य, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कार्यकर्त्याला 'माणूस' म्हणून घडविणारे व्यक्तिमत्त्व-दत्ता भांगे

## डॉ.रामदास आंबटकर यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम

**दैनिक वादळ वार्ता**
**सोलापूर । प्रतिनिधी**

अभिनव विचार मंचच्या वतीने दिवंगत डॉ. रामदास आंबटकर यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्यांच्या कार्याला उजाळा देत त्यांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. यावेळी विविध मान्यवरांनी उपस्थित राहून त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व संघटनात्मक योगदानाची आठवण करून दिली.कार्यक्रमात बोलताना अभिनव विचार मंचचे कार्यकर्ते दत्ता भांगे म्हणाले, एका कार्यकर्त्याला 'माणूस' म्हणून घडवणे, त्याला सक्षम करणे आणि समाजसेवेसाठी समर्पित करणे हे स्व. डॉ. रामदास आंबटकर यांचे जीवनध्येय होते. प्रत्येक कार्यकर्त्याची जडणघडण ओळखून त्याचे गुण विकसित करणे आणि दोष दूर करण्याची त्यांची कार्यपद्धती विशेष होती. त्यामुळे अनेक ध्येयवादी व समर्पित कार्यकर्त्यांची फळी त्यांनी उभी केली, असेही त्यांनी नमूद केले.ते पुढे म्हणाले की, डॉ. आंबटकर यांनी केवळ कार्यकर्त्यांचे घडवणूकच केली नाही, तर सामान्य कार्यकर्त्यांना राजकीय व सामाजिक क्षेत्रात पुढे नेण्यामध्येही त्यांचा मोठा वाटा होता. आमदारपदापासून मंत्रिपदापर्यंत अनेकांना त्यांनी मार्गदर्शन केले. मोठ्या नेत्यांपासून ते तळागाळातील कार्यकर्त्यांपर्यंत सर्वांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते.'शिक्षणातून समाज घडतो' या विचाराने प्रेरित होऊन त्यांनी आयुष्यभर कार्य केले. वडनेर सारख्या ग्रामीण भागातून आलेल्या डॉ. आंबटकर यांनी विद्यार्थी चळवळीत पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून काम करताना वैद्यकीय व्यवसायाकडे पाठ फिरवून संघटनात्मक कार्याला प्राधान्य दिले.




अभाविपमध्ये दीर्घकाळ संघटन मंत्री म्हणून काम करताना त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. पुढे भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सरचिटणीस, नागपूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य, व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तसेच विधान परिषदेचे आमदार म्हणूनही त्यांनी विविध जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या.

या कार्यक्रमास मंचाचे अध्यक्ष नितीन सुकळकर, सचिव ओमप्रकाश मुडे यांच्यासह चंद्रशेखर रेवतकर, विकास नागरकर, अरुण नौकरकर, शरद वाघमारे, विजय हटवार, विश्वास कातोरे, उमेश नेवारे, मांडवकर सर, किरण गेहरवार, राजेंद्र मोघे, युवराज आडे, रेणुदास नागतोडे, सारंग चरडे, मनोज ठाकरे, प्रमोद बोरकर, मनीष झाडे, महेंद्र पर्वत, काळे, आशिष बोबडे, प्रशांत चौधरी, निलेश बिडकर, शेखर दाते, श्रीकांत डोळसकर, सचिन कापकर, किशोर उकेकर, चौखे सर आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नितीन सुकळकर यांनी केले, तर सूत्रसंचालन ओमप्रकाश मुडे यांनी केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077